आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

१७ जून २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- पश्चिम बंगालमधल्या सिलिगुडीमध्ये रेल्वे अपघातात ८ जणांचा मृत्यू,  ५० जण जखमी / केंद्र सरकार आणि रेल्वेकडून आर्थिक मदत जाहीर

- मणीपूरमधल्या परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आज नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री उच्चस्तरीय बैठक घेणार

- परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर आणि अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिवन यांच्यात नवी दिल्लीत चर्चा

**आणि**

- ईद उल अजहा अर्थात बकरी ईद सण देशभरात उत्साहात साजरा / राष्ट्रपती, उपराष्ट्रपती आणि प्रधानमंत्र्यांकडून देशवासियांना शुभेच्छा

**<><><><><>**

पश्चिम बंगालच्या न्यु जलपायगुडी स्थानकाजवळ सियालदाहला जाणाऱ्या कांचनजंगा एक्सप्रेसला मालगाडीनं पाठीमागून धडक दिल्यानं झालेल्या भीषण अपघातात आतापर्यंत ८ जणांचा मृत्यू झाल्याचं वृत्त असून या अपघातात ५० जण जखमी झाले  आहेत. सिलिगुडीमध्ये झालेल्या रेल्वे अपघातातल्या मृतांमध्ये ३ रेल्वे कर्मचाऱ्यांचाही समावेश असल्याची माहिती  रेल्वे बोर्डाच्या अध्यक्ष जया वर्मा-सिन्हा यांनी दिली आहे. सर्व जखमींवर जवळच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनास्थळावरचं बचाव कार्य पूर्ण झाल्याचंही त्यांनी सांगितलं. मालगाडीनं सिग्नलकडे दुर्लक्ष केलं आणि काचंनजंगा एक्सप्रेला पाठीमागून धडक दिल्याची माहिती रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी दिली. या धडकेमुळे एक्सप्रेस गाडीचे काही डबे

रुळावरुन घसरले आहेत.  रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव घटनास्थळी रवाना झाले आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी या अपघाताबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं असून जखमींना लवकर बरं वाटावं, अशा सदिच्छा दिल्या आहेत. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून या प्रकरणी रेल्वेमंत्र्यांशी चर्चा केली आहे. या अपघातातल्या मृतांच्या कुटुंबाला प्रधानमंत्री मदत निधीतून २ लाख रुपये तर जखमींना ५० हजार रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे.

रेल्वेकडून मृतांच्या कुटुंबाला १० लाख रुपये, गंभीर जखमींना अडीच लाख रुपये आणि किरकोळ जखमींना ५० हजार रुपये देण्याची घोषणा रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी केली आहे. अपघातग्रस्त लोकांच्या नातेवाईकांच्या मदतीसाठी रेल्वेनं वेगवेगळ्या स्थानकांवर मदतकक्ष सुरु केले आहेत. या अपघातामुळं काही रेल्वेगाड्यांचे मार्ग बदलण्यात आले आहेत.

**<><><><><>**

यंदाच्या राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा अर्थात नीटमधील अनियमिततेसाठी जबाबदार असल्याचं आढळल्यास, अशा कोणत्याही अधिकाऱ्याची गय केली जाणार नाही, असं केंद्रिय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी काल स्पष्ट केलं. गैरप्रकाराच्या चौकशीत दोषी आढळलेल्या व्यक्तींना शिक्षा केली जाईल, असं आश्वासन सिंग त्यांनी ओडिशातल्या संबलपूर इथं माध्यमांशी बोलताना दिलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या उत्तर प्रदेशातल्या वाराणसीतल्या  कार्यक्रमात प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधीअंतर्गत २० हजार कोटी रुपयांहून अधिक

रक्कमेचा १७ वा हप्ता शेतकऱ्यांच्या खात्यांत जमा करणार आहेत. याचा लाभ नऊ कोटी २६ लाख शेतकऱ्यांना होणार आहे. या योजनेअंतर्गत आतापर्यंत ११ कोटींपेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांना तीन लाख कोटी रुपयांहून अधिक रक्कमेचा लाभ झाला आहे. याच कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांच्या हस्ते स्वयं सहाय्यता गटातील ३० हजारांहून अधिक महिलांना कृषी सखी हे प्रमाणपत्राचं वाटप करणार आहेत.

दरम्यान, प्रधानमंत्री उद्या आणि परवा उत्तर प्रदेश आणि बिहार राज्याच्या दौऱ्यावर आहेत. ते उद्या संध्याकाळी वाराणसीतल्या दशाश्वमेध घाटावर गंगा आरतीमध्ये सहभागी होतील आणि त्यानंतर ते काशी विश्वनाथ मंदिरात जाऊन दर्शन घेतली.

बुधवारी प्रधानमंत्री बिहार दौऱ्यावर असून यावेळी त्यांच्या हस्ते राजगीर इथल्या नालंदा विश्वविद्यालयाच्या परिसराचं उद्घाटन करतील. विश्वविद्यालयाच्या परिसराच्या उद्घाटनाच्या कार्यक्रमाला १७ देशांमधील नामवंत व्यक्ती सहभागी होणार आहेत. यावेळी प्रधानमंत्र्यांची जाहीर सभा होणार आहे.

**<><><><><>**

मणीपूरमधल्या सुरक्षापरिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आज नवी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह उच्चस्तरीय बैठक घेणार आहेत. केंद्र तसंच राज्यातले वरिष्ठ अधिकारी, लष्कर आणि अन्य सुरक्षा दलातले वरिष्ठ अधिकारी या बैठकीत सहभागी होतील.

**<><><><><>**

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर यांनी आज अमेरिकेचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार जेक सुलिवन यांची भेट घेतली. या वेळी दोघांमध्ये आंतरराष्ट्री, प्रांतीय

आणि परस्पर सहकार्य आदी विषयांवर चर्चा झाल्याचं त्यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

देशात सुरु असलेली अग्नीपथ ही योजना काही बदल करुन सैनिक समान योजना या नावानं पुन्हा सुरु केली जाणार असल्याचे समाजमाध्यमांवर फिरत असलेले संदेश निव्वळ अफवाच असल्याचं पत्र सूचना कार्यालयानं कळवलं आहे. या संदेशात या योजनेत काही बदल करण्यात आल्याचं म्हटलं आहे तेही खोडसाळपणाचं असल्याचंही कार्यालयानं कळवलं असून नागरिकांनी या संदेशांवर विश्वास ठेवू नये, असंही म्हटलं आहे.

**<><><><>**

ईद उल अजहा हा सण देशभरात उत्साहाने साजरा होत आहे. देशाच्या विविध भागात आज ईदगाह तसंच मशिदीत नमाज अदा करुन एकमेकांना शुभेच्छा देण्यात आल्या. दिल्लीत जामा मशिद, फतेहपुरी मशिद आणि शाही इदगाहमध्ये नमाज अदा करण्यात आली.

**<><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारतीयांना ‘इद उल अजहा’च्या शुभेच्छा दिल्या आहेत. ईद उल अजहा हा त्यागाचं स्मरण करण्याचा दिवस आहे आणि आनंद वाटून घेण्याचा संदेश त्यातून मिळतो, असं राष्ट्रपती मुर्मू यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. या सणाच्या माध्यमातून एकात्मता, करुणा आणि सार्वभौमत्व या मुल्यांची जपणूक करावी, असं आवाहन उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी केलं आहे. ईद-उल अजहा या खास दिवसाच्या निमित्तानं समाजात एकोपा आणि

सुसंवाद वाढीला लागावा, अशा सद्भावना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात व्यक्त केल्या आहेत.

<><><><><>

बांगलादेशातही उत्साहाने आणि धार्मिकतेने इद साजरी होत आहे. इदनिमित्त एकत्रित नमाज अदा करण्यात येत आहे.  बांगलादेशाचे राष्ट्रपती मोहम्मद शहाबुद्दीन तसंच प्रधानमंत्री शेख हसीना यांनी ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

सिक्कीमच्या पुरग्रस्त भागात अडकलेल्या सुमारे दोन हजार पर्यटकांना सुरक्षीतपणं बाहेर काढायला आज सकाळपासून सुरुवात झाली आहे. पूरग्रस्त भागात अडकलेल्या सर्व प्रवाशांना रस्तेमार्गे बाहेर काढण्यात येत असल्याची माहिती मगन जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हेमुकमार छेत्री यांनी सांगितलं.

<><><><><>

मुस्लिम धर्मात महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या हज यात्रेचा उद्या शेवटचा दिवस आहे.  हज यात्रेच्या निमित्ताने दरवर्षी जवळपास १८ लाख नागरिक सौदी अरेबियाला येतात. यात्रेदरम्यान तापमानाचा त्रास कमी करण्यासाठी सौदी प्रशासनाकडून अनेक उपाययोजना केल्या जातात परंतू  वाढत्या तापमानाचा फटका  हज यात्रेकरुंनाही बसत आहे. या आठवड्यात तिथे ४६ अंश सेल्सियसपर्यंत गेलेल्या तापमानाचा फटका यात्रेकरुंना विशेषतः वयोवृद्धांना बसला.  हज यात्रा करत असलेले जॉर्डनचे १४ नागरीक मृत्यू पावले तर सतरा जण बेपत्ता आहेत, अशी माहिती जॉर्डनच्या परराष्ट्रमंत्रालयानं दिली आहे.  इराणच्या रेड क्रिसेंट  या स्वयंसेवी संस्थेने हज यात्रेवर असलेल्या पाच इराणी नागरीकांचा मृत्यू झाल्याची माहिती दिली आहे.

<><><><><>

येत्या २१ जूनला असलेल्या आंतरराष्ट्रीय योग दिवसाचं औचित्य साधत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज समाजमाध्यमावर भद्रासन करतानाचा व्हिडिओ शेअर केला आहे. भद्रासनामुळे सांधे दुखी कमी होऊन ते मजबूत होतात. रोज भद्रासन केल्यामुळे गुडघेदुखीचा त्रासही कमी होतो, असं प्रधानमंत्र्यांनी हा व्हिडिओ शेअर करताना लिहिलं आहे.

<><><><><>

मुंबईत सुरु असलेल्या १८ व्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात आज 'सामाजिक परिवर्तन करण्याची माहितीपटांची क्षमता' या विषयावर चर्चासत्र झालं. दिग्दर्शक टी. एस. नागभरण यांची मुलाखत डी. रामकृष्णन यांनी घेतली. याशिवाय 'माहितीपटांमधलं निर्मितीमधून महिलांचं भावविश्व' या विषयावरही चर्चा सत्र झालं. याशिवाय विविध माहितीपट, लघुपट आणि ॲनिमेशनपट आज दाखवले जाणार आहेत.

<><><><><>

इटालियन खुल्या महिला गोल्फ स्पर्धेत भारताची दीक्षा डागर हिला सहावं स्थान मिळालं आहे. या स्पर्धेचं विजेतेपद मिळवलेल्या इंग्लंडची एमी टेलर हिच्यापेक्षा दीक्षा चार शॉट मागं होती. पुढच्या आठवड्यात दीक्षा चेक महिला खुल्या गोल्फ स्पर्धेत सहभागी होणार आहे. गेल्यावर्षी दीक्षानं या स्पर्धेचं विजेतेपद पटकावलं होतं.

<><><><><>

टी- ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत आज श्रीलंकेने नेदरलँडचा ८३ धावांनी पराभव केला. श्रीलंकेने केलेल्या २०१ धावांचा पाठलाग करताना नेदरलँडचा संघ

११८ धावांवर गारद झाला. २१ चेंडूत ४६ धावा करणारा श्रीलंकेचा चेरित असालंका सामनावीरचा मानकरी ठरला आहे.

या स्पर्धेतल्या दुसऱ्या सामन्यात बांगलादेशने नेपाळला २१ धावांनी मात दिली. पहिल्यांदा फलंदाजी करणाऱ्या बांगलादेशने नेपाळसमोर उभारलेलं १०६ धावांचं आव्हान पूर्ण करताना नेपाळचा संघ ८५ धावांवर ढेपाळला. या सामन्यानंतर बांगलादेशने सुपर ८ मध्ये आपलं स्थान पक्कं केलं आहे, तर नेपाळ स्पर्धेतून बाहेर पडला आहे.

**//<><><><><>//**